श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे पशुधन पर्यवेक्षक पवैद दाढ बु.ता.राहाता यांना सेवेत पुर्न:स्थापित करणे बाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
पशुसंवर्धन विभाग.
जि.प.आदेश जा.क्र.पसं/आस्था-1/775/2025
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केले प्रमाणे

वाचा :- 1.महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.निप्रआ-1111 प्र.क्र.86/11-अ दिनांक 14 ऑक्टोंबर 2011.
2. महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.निप्रआ-1112 प्र.क्र.82/11-अ दिनांक 20 एप्रील 2013
3. इकडील सेवानिलंबन आदेश क्र.पं.स/आस्था-1/552/2025 दिनांक 25.07.2025
4. या कार्यालयाकडील दोषारोप पत्र क्र.पसं/आस्था-1/625/2025 दिनांक 01.10.2025
5. गट विकास अधिकारी पंचायत समिती राहाता यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-1 /1259/2025 दिनांक 30/10/2025

श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे,पशुधन पर्यवेक्षक हया पशुवैदयकीय दवाखाना दाढ बु ता.राहाता येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी गैरशिस्त व गैरवर्तन केलेने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम 1967 मधील नियम 3 चा भंग केल्याने संदर्भ क्र.3 अन्वये सेवेतुन निलंबीत करणेत आले होते.निलंबन कालावधीमध्ये त्यांचे मुख्यालय पंचायत समिती कोपरगांव येथे ठेवण्यात आले होते.श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे यांना संदर्भ क्र.4 चे दोषारोप पत्र (परिशिष्ट 1ते 4) दिनांक 01.10.2025 रोजी बजावण्यात आले आहेत.

त्याअर्थी संदर्भ क्र.5 अन्वये श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, सेवा निलंबीत पशुधन पर्यवेक्षक यांनी दोषारोप पत्राचा खुलासा इकडील कार्यालयास सादर केला आहे.

सबब संदर्भ क्र.1 व 2 मधील तरतुदी विचारात घेऊन मी मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद अहिल्यानगर श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे,सेवा निलंबीत पशुधन पर्यवेक्षक यांना पशुधन पर्यवेक्षक या पदावर पुर्न:स्थापीत करण्यात येऊन त्यांना पशुवैदयकीय दवाखाना धामोरी ता.कोपरगाव येथे पशुधन पर्यवेक्षक या पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.तसेच श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे,सेवा निलंबीत पशुधन पर्यवेक्षक यांचे सेवा निलंबन कालावधीचा निर्णय स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे, यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे.सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात येऊन सदर आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्रमांक 202606191110028 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 19-06-2026 13:18:18
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे,,सेवानिलंबीत पशुधन पर्यवेक्षक पवैद दाढ बु पंचायत समिती राहाता व्दारा गटविकास अधिकारी पंचायत समिती राहाता

2/-सदर आदेशाची प्रत श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे,पशुधन पर्यवेक्षक यांना समक्ष बजाविणेत येऊन दुय्यम प्रतीवर दिनांकीत स्वाक्षरीसह प्रत या कार्यालयास सादर करणेची दक्षता घेणेत यावी.

प्रत:- गट विकास अधिकारी पंचायत समिती कोपरगांव

2/- श्रीम.दर्शना राजेंद्र सातदिवे,पशुधन पर्यवेक्षक हे पशुधन पर्यवेक्षक या पदावर रुजू झालेनंतर रुजू अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत:-गटविकास अधिकारी पंचायत समिती राहाता / कोपरगाव.

Scanned with OKEN Scanner